# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून शिक्षण संक्रमण अंक शुल्कबाबत.**

**परिपत्रक क्रमांक कोविमं/शिक्षण संक्रमण/२०२०/ 4609 दिनांक २४/८/२०२०**

संदर्भ: १) मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक रा.मं./प्रकाशन/शिक्षण संक्रमण/३२२२, दि.१५/७/२०२०

२) या कार्यालयाचे क्रमांक कोविमं/लेखा/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी/४१९६, दि. २८/७/२०२०

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्राचार्य व मुख्याध्यापक, मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दरमहा शिक्षण संक्रमण अंक प्रकाशित केले जातात. संदर्भीय पत्रान्वये सदर शिक्षण संक्रमण अंक मासिक वर्गणी शुल्क शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून प्रति अंक रू.२५०/- करण्यात आले असल्याबाबत व मंडळाच्या मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रत्येक महिन्याचे किमान दोन अंकांचे वार्षिक वर्गणीदार होणे बंधनकारक करण्यात आले असल्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्यानुसार सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांनी दोन शिक्षण अंकाची वार्षिक वर्गणी रू.५००/- शुल्क जमा करणे आवश्यक आहे. परंतु काही माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी रू.२५०/- व रू.२००/- असे शिक्षण संक्रमण वर्गणी जमा केल्याबाबत निदर्शनास येत आहे. तरी ज्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी रू.२५०/- किंवा रू.२००/- प्रमाणे भरलेली आहे अशा शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी उर्वरित फरकाची रक्कम आपल्या नजीकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये चलनाने जमा करण्यात यावी व चलनाची प्रत विभागीय मंडळ कार्यालयास त्वरीत पाठविण्यात यावी.

तसेच ज्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी अद्याप नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी शुल्क जमा केले नाही त्यांनी संदर्भ क्रमांक २ च्या परिपत्रकानुसार नोंदणी शुल्क व दोन शिक्षण संक्रमण अंकांची वर्गणी रू.५००/- (२५०+२५०) प्रमाणे आपल्या नजीकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत दिनांक ३१/८/२०२० पर्यंत चलनाने भरून सदर चलनाची प्रत कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालयास त्वरीत पाठविण्यात यावी.

प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर